C-35

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**विषय – नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा.ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.७/१२/२०२३ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम | दि. ७/१२/२०२३ पर्यंतची शिल्लक | शेरा (मुळ तरतूद + पुनर्विनियोजनाने घेतलेली तरतूद सह तरतूद रक्कम) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाले गटार मो-या बांधणे | रु. ५३८.७३ लक्ष | रु.५३८.७१ लक्ष | रु.०.०२ लक्ष | (५००.००+३८.७३ = ५३८.७३ लक्ष) |
| | एकूण | रु. ५३८.७३ लक्ष | रु.५३८.७१ लक्ष | रु.०.०२ लक्ष | |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामधील नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामधील निधी संपलेला आहे. वार्ड क्र.७ हाफीजनगर येथे पुर्णपणे गटर नादुरुस्त असून सांडपाणी रस्त्यावर वाहत असल्यामुळे नागरिकांना येथून चालण्यास त्रास होत आहे तसेच परिसरात दुर्गधी पसरलेली आहे. त्यामूळे नविन गटरीचे काम करणे गरजेचे असल्याने कामाचा अंदाजपत्रकीय खर्च रु. १९,८६,८०९/- लक्ष आहे. मात्र नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक नसल्यामुळे इतर लेखाशिर्षकामधून पुनर्विनियोजन करुन निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. तरी खालील कामाकरीता वरील लेखाशिर्षामध्ये "आरक्षित जागांना कुंपन घालणे व भिंत बांधणे " या लेखाशिर्षामधुन रु. १९.८७/- लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| वार्ड क्र७ हाफीजनगर मध्ये शहाना हॉटेल ते अब्दुल्ला अन्सारी बिल्डींग पर्यत गटार व पाथवेज बनविणे. | रु. १९,८६,८०९/- लक्ष | |
| एकूण | रु. १९,८६,८०९/- लक्ष | |

खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि. ७/१२/२०२३ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम पुनर्विनियोजना च्या रक्कमेसह | दि. ७/१२/२०२३ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरक्षित जागांना कुंपन घालणे व भिंत बांधणे | रु.१००.०० लक्ष | रु.३९.८९ लक्ष | रु.६०.११ लक्ष | रु.१९.८७ लक्ष |
| | एकूण | रु.१००.०० लक्ष | रु.३९.८९ लक्ष | रु.६०.११ लक्ष | रु.१९.८७ लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा०ो. यांच्याकडे निहीत आहेत.

वार्ड क्र७ हाफीजनगर मध्ये शहाना हॉटेल ते अब्दुल्ला अन्सारी बिल्डींग पर्यत गटार व पाथवेज बनविणे. विषयांकित कामाकरीता निधीचे पुनर्विनियोजन करणेकामी कनिष्ठ अभियंता, प्रभाग समिती क्र.४ यांनी मुळ संचिकेसह प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये "आरक्षित जागांना कुंपन घालणे व भिंत बांधणे " या लेखाशिर्षामधून रु.१९.८७ लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे.

त्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सा०ो. यांनी दिनांक १५/१२ /२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

ठराव क्र. ३०८ दिनांक १८/१२/२०२३

वार्ड क्र७ हाफीजनगर मध्ये शहाना हॉटेल ते अब्दुल्ला अन्सारी बिल्डींग पर्यत गटार व पाथवेज बनविणे. सदर ठिकाणी गटर पुर्णपणे नादुरुस्त असून सांडपाणी रस्त्यावर वाहत असल्यामुळे नागरिकांना येथून चालण्यास त्रास होत आहे तसेच परिसरात दुर्गधी पसरलेली आहे. त्यामूळे नविन गटरीचे काम करणे गरजेचे आहे. मात्र विषयांकित काम करणेकरीता नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये तरतुद (निधी) शिल्लक नसल्यामूळे "आरक्षित जागांना कुंपन घालणे व भिंत बांधणे" या लेखाशिर्षामधून एकूण रु.१९.८७ लक्ष रुपयाचे नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका